ॲग्रोमेटॲडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५
फोन : ०२०-२९५१६२६४
ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३/१०/२०२६

## जिल्हा : पुणे

| मागील आठवड्यातील हवामान (०७/१०/२०२६ ते १३/१०/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१३/१०/२०२६ ते १७/१०/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | दिनांक | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0.0 | 1.0 | 2.0 | 4.0 | 6.0 |
| 35.7 | 35.2 | 35.2 | 35.0 | 35.8 | 35.2 | 35.4 | कमाल तापमान (अं.सें.) | 36 | 36 | 36 | 35 | 34 |
| 21.6 | 21.1 | 21.3 | 21.7 | 21.4 | 19.3 | 19.2 | किमान तापमान (अं.सें.) | 22 | 22 | 23 | 24 | 24 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 1 | 1 | 3 | 4 | 6 |
| 95 | 95 | 88 | 84 | 80 | 84 | 88 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 83 | 90 | 92 | 93 | 97 |
| 29 | 32 | 33 | 29 | 31 | 31 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 52 | 51 | 51 | 53 | 59 |
| 2.1 | 2.6 | 2.5 | 2.6 | 2.1 | 2.1 | 2.4 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 6 | 7 | 7 | 5 | 5 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 68 | 360 | 93 | 60 | 69 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्याच्या पूर्व भागात दिनांक १३ ऑक्टोबर, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता तर दिनांक १४, १५, १६ व १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून जिल्ह्याच्या पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक १३ ऑक्टोबर, २०२६ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता तर दिनांक १४, १५ व १६ ऑक्टोबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी तर दिनांक १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात<br>➢ जिल्ह्याच्या पूर्व भागात दिनांक १६ व १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असून<br>➢ जिल्ह्याच्या पश्चिम (घाट क्षेत्र) भागात दिनांक १६ व १७ ऑक्टोबर, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना, विजासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| **विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)** | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १८ ते २४ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | • वादळी वारा, मेघगर्जना, विजासह पावसाची शक्यता असल्यामुळे काढणी केलेल्या धान्याची सुरक्षित ठिकाणी साठवण करावी तसेच जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या 'कृषिदर्शनी'चा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा.<br>• पिकांमध्ये पावसाच्या खंडांमुळे ओलाव्याचा ताण जाणवत असेल आणि पाणी उपलब्ध असेल तर संरक्षित पाणी द्यावे.<br>• जिल्ह्यातील कोरडवाहू क्षेत्रात उपलब्ध ओलीवर रब्बी पिके जसे हरभरा, करडई आणि रब्बी ज्वारी पिकाच्या पेरणी चे नियोजन करावे तसेच पिकाच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थेत संरक्षित पाण्याचे नियोजन करावे.<br>• बागायती क्षेत्रात रब्बी हंगामाच्या पूर्वतयारीसाठी करावयाची कामे जसे माती परीक्षणासाठी नमुने घ्यावेत, खरीप पिकांची काढणी व अवशेष व्यवस्थापन करावे , उपलब्ध सिंचन पाण्यानुसार रब्बी पीक पद्धती निश्चित करावी , हरभरा, रब्बी ज्वारी, गहू, करडई, रब्बी मका इत्यादी पिकांचे नियोजन करावे , प्रमाणित बियाणे व आवश्यक निविष्ठांची उपलब्धता करून ठेवावी, बीजप्रक्रियेसाठी आवश्यक साहित्य तयार ठेवावे, शेतातील बांध, चर व निचरा व्यवस्था दुरुस्त करावी, खतांची गरज माती परीक्षणाच्या आधारे निश्चित करावी.<br>• रब्बी हंगामात पेरणी करावयाची असल्यास पिकाच्या संवेदनशील वाढीच्या अवस्थेसाठी संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यासच नियोजन करावे. पेरणी साठी कमी कालावधीच्या वाणांची निवड करावी.<br>• संरक्षित सिंचनाचा अत्यंत काटकसरीने वापर करावा. जास्तीत जास्त पाणी बचती साठी तुषार अथवा ठिबक सिंचनाचा कटाक्षाने वापर करावा.<br>• रब्बी हंगामात पेरणी करताना शक्यतो आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. उदा. ज्वारी + हरभरा (६:३), करडई + हरभरा (३:६). |

| | | |
|---|---|---|
| | | • जल व मृद संधारणासाठी बी बी एफ यंत्राद्वारे पेरणी करावी.<br>• पेरणीवेळीस फुले बायोमिक्सची बीजप्रक्रिया करावी. तसेच सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यास फुले ग्रेड II ची फवारणी १० मिली प्रति लिटर पाणी प्रमाणे करावी.<br>• रब्बी हंगामात पिकामध्ये तणनाशके यांचा वापर कमी करून वेळोवेळी कोळपणी आणि खुरपणी करून पिके तणविरहित ठेवावीत. |
| **खरीप भात** | फुलोरा ते दाणे भरण्याची अवस्था | भात खाचरातील पाण्याची पातळी फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत १० सें.मी. ठेवावी.<br>भात पिकावरील करपा आणि पर्ण करपा रोगांच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के इ.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. भात पिकावरील खोड किडीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा जपोनिकम या प्रजातीच्या ट्रायको कार्ड ५ ते ६ प्रति हेक्टरी ३ ते ४ वेळा वापरण्यात यावे. |
| **ऊस** | पीक वाढीची अवस्था | खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे.<br>ऊस पिकावरील पायरीला किडीचे नियमित निरीक्षण करावे. सरासरी ३ ते ५ पिल्ले किंवा प्रौढ कीड प्रति पान अथवा एका पानावर एक अंडीपुंज आढळल्यास आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्याचे मानून त्वरित नियंत्रणाच्या उपाययोजना सुरू कराव्यात. आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतरच क्लोरपायरीफॉस २० टक्के ई.सी. ३० मि.ली. किंवा ॲसिफेट ५० टक्के + इमिडाक्लोप्रिड १.८० टक्के एस.पी. ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीपूर्वी संबंधित कीटकनाशकाचे सध्याचे CIBRC लेबल-क्लेम, पीक व किडीसाठी मंजुरी तसेच लेबलवरील सूचना तपासूनच वापर करावा. उभ्या ऊस पिकातील खालची वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी.<br>पिकास पाण्याचा ताण पडत असल्यास दर तीन आठवड्यांनी २ % मुरेट ऑफ पोटॅश व २ % युरिया यांचे मिश्रण तयार करून पिकांवर फवारणी करावी. |
| **हरभरा** | पेरणी अवस्था | कोरडवाहू हरभऱ्याची पेरणी जमिनीत पुरेसा ओलावा असताना करावी. बागायती हरभऱ्यासाठी साधारणतः २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत पेरणी करावी. हरभऱ्याची पेरणी करावयाची असल्यास पहिल्या खुरपणी नंतर (२५-३० दिवसांनी) व घाटे धरण्याच्या अवस्थेत (६५-७० दिवसांनी) संरक्षित पाणी द्यावे. हरभऱ्याच्या फुले विक्रम या जातीची लागवड करून तुषार सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास शाश्वत उत्पादन शक्य आहे. |
| **तुर** | फुलोरा ते शेंगा धरण्याची अवस्था | सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी तुरीची पेरणी केलेली असल्यास पेरलेल्या तुरीची फुलोरा ते शेंगा धरण्याची अवस्थेत (७०-१३० दिवस) संरक्षित पाणी द्यावे. |
| **सोयाबीन** | पक्वता ते काढणी अवस्था | काढणी अगोदर थायोफिनेट मिथील ७०% डब्ल्यू पी हे बुरशीनाशक १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून शेंगांवर फवारल्यास बुरशीजन्य रोगापासून नुकसान टाळणे शक्य होते. पक्व झालेल्या सोयाबीन पिकाची काढणी चालू करावी. काढणी केलेले पीक ३-४ दिवस उन्हात वाळवून मळणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **रब्बी ज्वारी** | पेरणी अवस्था | जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर ज्वारीची पेरणी १५ ऑक्टोबर पर्यत ५ सें.मी. खो लीवर करावी. जमिनीच्या खोलीनुसार पिकाच्या वाणाची निवड करावी. पेरणी ४५×१५ सें.मी. अंतरावर करावी. शिफारशीप्रमाणे खत पेरणीच्या वेळी वापरावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक ८० टक्के डब्लु.पी. (३०० मेश पोताचे) चोळावे तसेच २५ ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व पी.एस.बी. कल्चर चोळावे. बागायत ज्वारीची पेरणी ४५ ×१२ सें.मी. अंतरावर करावी. जिवाणू संवर्धनाची प्रक्रिया करुन हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. पेरणीसाठी दोन चाड्याची पाभर वापरून एकाच वेळी खत व बियाणे पेरावे. जिथे ज्वारीची पेरणी लवकर झाली आहे तिथे खोड किडी च्या जैविक नियंत्र णासाठी ५ ते १० ट्रायकोकार्ड आठवड्याच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे. |
| **मका** | पक्वता ते काढणी अवस्था | पक्व झालेल्या कणसांची काढणी करावी. काढणी केलेली कणसे ४-५ दिवस चांगले उन्हात वाळवून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **वांगी** | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या (तुडतुडे) किडीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५% ई.सी.४ मिली किंवा फ्लोनीकॅमिड ५० टक्के डब्लु. जी. ४ ग्रॅम किंवा ॲफिडोपायरोपेन ५० डी.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **कांदा** | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल., ३ मिली प्रति १० लिटर या प्रमाणे फवारणी करावी. पुनर्लागवड रांगडा कांदा लागवड पुर्ण करावी. यासाठी फुले समर्थ या सुधारित वाणाचा तसेच र ब्बी हंगामासाठी N-2-4-1 या वाणाचा वापर करावा. |
| **केळी** | पीक वाढीची अवस्था | केळी पिल बागेत आता मोठ्या प्रमाणात करपा रोगाची लागण झालेली आहे , त्यासाठी शेतकऱ्यांनी मेटिरम + पायऱ्याक्लस्ट्रोबिन या संयुक्त बुरशीनाशकाची तीन ग्रॅम प्रति लिटर पाणी अधिक बॅनोले (मिनरल ऑइल) १० मिली प्रति लिटर किंवा **Azoxystrobin + Difenconazole** २ मिली प्रति लिटर पाणी किंवा टेबुकनाझोल + ट्रीफ्लॉप झीस्ट्रोबिन ०.५ मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. नवती बागेला कार्बेन्डाझिम १ ग्रॅम किंवा **Tilt (Propiconazole)** ०.५ मिली प्रति लीटर + मिनरल ऑइल १० मिली प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. सीएमव्ही या विषाणूजन्य रोगग्रस्त झाडे उपटून, ईमिडाक्लिप्रिड ०.५ मिली प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी. जर कंदसड रोग दिसला तर त्या झाडाला चार ग्रॅम प्रति झाड प्रमाणे ब्लीचिंग पावडर बांगडी पद्धतीने देऊन नंतर पाणी द्यावे . केळी लागवडीनंतर चौथ्या महिन्यात सुक्ष्म अन्नद्रव्ये इडिटीए-जस्त आणि इडिटीए -लोह यांची प्रत्येकी ५० ग्रॅम मात्रा १० लिटर पाण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | घेऊन फवारणी करावी. बागेस उपलब्धतेनुसार व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. तसेच बाष्पीभवन कमी करण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा तसेच दर पंधरा दिवसांनी १० लीटर पाण्यात ८० ग्रॅम केओलीन हे बाष्परोधक घेवून त्याची केळीच्या पानांवर फवारणी करावी . पाण्याच्या ताणाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी ॲसिटील सॅलिसिक आम्ल १८ मिलीग्रॅम प्रती लीटर पाण्यात घेवून फवारणी करावी. |
| **अंजीर** | पीक वाढीची अवस्था | खट्टा / मिठा बहार : अंजीराला कोवळी पाने फुटल्यानंतर साधारणत: छाटणीनंतर २० दिवसापासून १५ दिवसाच्या अंतराने २० ग्रॅम क्लोरोथॅलोनील + १० ग्रॅम कार्बेनडॅझीम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे किंवा १० ग्रॅम कार्बेनडॅझीम + २५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा १० ग्रॅम कार्बेनडॅझीम अधिक २० ग्रॅम कॅप्टन वरील पैकी कोणतीही एक फवारणी आलटून पालटून करावी. अंजीर काढणीच्या एक महिना अगोदर फवारणी बंद करावी . अंजीर पिकातील खोड कीडग्रस्त फांदया, खोडे वेळोवेळी काढून नष्ट कराव्यात प्रतिबांधात्मक उपाय म्हणून खोड आणि फांदयांना मुलामा (पेस्ट) द्यावा. त्याकरीता पेस्ट तयार करण्यासाठी १० लि. पाण्यात ४ कि. गेरू रात्रभर भिजत घालून दुस-या दिवशी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही ५० मिली अधिक कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम एकत्रित चांगले मिसळून तयार झालेल्या पेस्टचा मुलामा खोडावर लावावा. (अंजीर पिकात कोणतेही किटकनाषक लेबल क्लेम नाही).<br>बाष्पीभवनाचा वेग मंदावण्यासाठी आणि झाडाचे तापमान कमी ठेवण्यासाठी केओलिन (पांढरी माती) ४० ते ५० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून झाडावर फवारणी करावी , ज्यामुळे पानांवर पांढरा संरक्षक थर तयार होतो किंवा पानांमधील पाण्याचा समतोल टिकवण्यासाठी पोटॅशियम नायट्रेट ( 13:0:45) १० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>अंजीर पिकात मीठा बहार धरतांना छाटणी व जमिनीची मशागत करून खते व पाणी देऊन बहार धरावा.पूर्ण वाढलेल्या झाडास बहार धरताना चांगले कुजलेले ५० किलो शेणखत व ११२५ ग्रॅम नत्र , ३२५ ग्रॅम स्फुरद, ४१५ ग्रॅम पालाश प्रति झाड जमिनीत मिसळून द्यावे. स्फुरद व पालाशची संपूर्ण तर नत्राची अर्धी मात्रा खोडापासून दूर फांद्याच्या परिघाखाली रिंग करुन द्यावी व खते झाकून पहिले पाणी द्यावे. उरलेल्या अर्ध्या नत्राची मात्रा एक महिन्याच्या अंतराने द्यावी. प्रती झाड प्रती वर्षी ५ किलो निंबोळी पेंड द्यावी. बहार नियोजन करताना जिवाणूसंवर्धक, हिरवळीचे खत, गांडूळ खत, योग्य आच्छादन व पिकांचे अवशेष इ. सेंद्रिय पदार्थांचा वापर महत्वाचा आहे.<br>हलक्या जमिनीत ५ ते ६ दिवसांनी , मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी आणि भारी जमिनीत १० ते १२ दिवसांनी पाणी द्यावे. बागेस ठिबक सिंचनाचा वापर करावा. |
| **सिताफळ** | पीक वाढीची अवस्था | हलक्या जमिनीत ५ ते ६ दिवसांनी , मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी आणि भारी जमिनीत १० ते १२ दिवसांनी पाणी द्यावे. बागेस ठिबक सिंचनाचा वापर करावा. सिताफळाची काढणी पक्वतेची लक्षणे दिसल्यास जसे फळांचा रंग फिकट हिरवा झाल्यावर , फळाचे डोळे उघडून दोन डोळयांमधील भाग पांढरट पिवळसर रंगाचा दिसू लागल्यावर फळांचे खवले उंच होतात, फळांची साल डोळयामधून फाटण्यास सुरुवात झालेवर काढावीत. फळे काढल्यानंतर प्रतवारी करुन क्रेटमध्ये अगर कोरुगेटेड फायबर बोर्ड बॉक्सेस मध्ये पॅकिंग करुन त्वरीत विक्रीसाठी पाठवावी. |
| **फळबाग** | नियोजन | सध्याच्या हवामानामुळे फळबागांमध्ये बाष्पीभवन कमी करण्यासाठी ऑरगॅनिक आच्छादनाचा वापर करावा तसेच बाष्परोधकाची (केओलीन ३%) फवारणी करावी. बागेस ठिबक सिंचनाचा सकाळ आणि संध्याकाळी वापर करावा. फळधारणा जास्त असल्यास विरळणी करावी. बागेत नत्र खताचा वापर कमी करावा. बाग नेहमी तणनियंत्रण करून स्वच्छ ठेवावी. बागेस सेंद्रिय खतांचा वापर करावा. पाण्याची उपलब्धता, वाढते तापमान बघता पीक घेण्यापेक्षा झाडे वाचवणे यावर भर द्यावा. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | पाणी अत्यंत मर्यादित असल्यास मोठ्या क्षेत्रावर चारा पीक घेण्याऐवजी आवश्यक पशुधनासाठी मर्यादित क्षेत्रात संरक्षित सिंचनाखाली चारा उत्पादन करण्याचे नियोजन करता येईल. उपलब्ध पाणी , पेरणीची वेळ, जमिनीतील ओलावा आणि स्थानिक हवामान लक्षात घेऊन ज्वारी , बाजरी, मका, बरसीम किंवा लुसर्न यांसारख्या चारा पिकांचा विचार करता येतो. संभाव्य चाराटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध हिरवा चारा , कडबा, पिकांचे अवशेष, वाळलेला चारा आणि इतर स्रोतांचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध चाऱ्याचे संवर्धन , कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांची लागवड, मुरघास निर्मिती, चाऱ्याची पौष्टिकता वाढविणे तसेच सामूहिक चारा व्यवस्थापन यांवर विशेष भर देणे गरजेचे आहे. उपलब्ध हिरवा चारा एकाच वेळी मोठ्या प्रमाणात जनावरांना देण्याऐवजी त्याचे नियोजनबद्ध वाटप करावे. सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका, तूर आणि इतर पिकांपासून उपलब्ध होणारे अवशेष चारा म्हणून वापरावेत. या अवशेषांचे योग्य प्रकारे कुट्टीकरण करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक केल्यास भविष्यातील चाराटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होते. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत उत्पादित होणाऱ्या जिवाणू खतांची माहिती तसेच उपलब्धता ठिकाण कृषि अणुजीवशास्त्रज्ञ, कृषि महाविद्यालय, पुणे-४११००५**
**फोन नं.: (०२०) २५५३७०३३ विस्तार २३२ किंवा २२८**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : १३.१०.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**